# ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

(विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जळगाव परिमंडळ


**दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४**
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच**
**जुनी एम.आय.डी.सी.**
**अजिंठा चौफुली**
**जळगाव –४२५ ००३**


---

**जा.क्र: स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./भुसावळ/९-१४/** **दिनांक :– १७ /१०/२०१४**

No 0 0 1 3 2 17 OCT 2014

**(रजिष्टर पोच व्दारे)**

गाऱ्हाणे दाखल दिनांक: २५/०६/२०१४
निकाल दिनांक : १७ /१०/२०१४

प्रति,

१) श्री.विलास माधव नेमाडे.
माधवाश्रय, गायत्री शक्तीपीठ रोड,
भुसावळ. ४२५२०१.
(ग्राहकक्र. ११७७५०२११२५३ ) } तक्रारदार

२) म. नोडल अधिकारी,
म.रा.वि.वितरण. कंमनी.मर्या.
मंडळ कार्यालय,विद्युत भवन,
जळगाव.
३) म. कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण.कंमनी.मर्या.
विभागिय कार्यालय,भुसावळ.
जि.जळगाव. ४२५२०१ } विज वितरण परवानाधारक

---

## निर्णयपत्र

श्री. विलास माधव नेमाडे. माधवाश्रय, गायत्री शक्तीपीठ रोड, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव. हे विज वितरण कंपनीचे घरगुती ग्राहकआहेत. त्यांनी म.रा.विज वितरण कंपनीकडे जादा घेतलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणेबाबत तक्रार अर्ज सादर केला. या विषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंमनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीकडे दि. २४.०३.२०१४. रोजी तक्रार दाखल केली. पण अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समिती कडुन विहीत कलावधीत कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने आपले गाऱ्हाणे त्यांनी अनुसुची ‘अ’ मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक १५८ अन्वये दि. २५.०६.२०१४. रोजी नोंदविण्यात आले.




Scanned by CamScanner

मंचाच्या अध्यक्षांशी सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला गाऱ्हाणे अर्जाची सुनवणी मंचाच्या कार्यालयात दि. ०८.१०.२०१४ रोजी दुपारी ११.३०. वाजता निश्चित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि.२२.०९.२०१४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी,जळगाव मंडळ कार्यालय,जळगाव व कार्यकारी अभियंता, भुसावळ विभाग यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्येनिहाय अभिप्राय १५ दिवसात मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोहचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.आर.जी.भोंगाडे जळगाव मंडळ, श्री.एन डी नारायणे. कार्यकारी अभियंता भुसावळ विभाग, हे उपस्थित होते. तर ग्राहक स्वतः उपस्थित होते.

**ग्राहकाची बाजु :**

१. श्री. विलास माधव नेमाडे यांचे भुसावळ शहरात कनेक्शन आहे. त्याचे बिल ते नियमित पणे भरतात. या कनेक्शनसाठी त्यांनी रु. ७१८०/- एवढी अनामत रक्कम भरली आहे. त्यांचा विजेचा वापर कमी आहे. तरी त्यांना रु. ७१८०/- सुरक्षा अनामत भरणेसाठी डिमांड नोट दिली. ती त्यांनी भरली आहे.

२. त्यांचा वापर पहाता फक्त रू. १०००/– सुरक्षा अनामत रक्कम विज कंपनीने घेणे आवश्यक होते कारण म.रा.नि. आयोग विनियम २००५ मध्ये दिलेल्या सुचना कलम ११ नुसार व ११.२ नुसार १२ महिन्याचे देयकांचे सरासरी एवढीच रक्कम सुरक्षा अनामत कंपनीस घेता येते.

३. मार्च–२०१३ ते फेब्रु–२०१४ या देयकांची सरासरी काढली असता ती रू. ९५६.६ ऐवढीच येते.

४. तरी नियमानुसार सुरक्षा अनामत रक्कम खात्यावर ठेवुन उर्वरीत रक्कम धनादेशाने परत करण्यात यावी.

**ग्राहकाच्या मागण्या :–**

१. नियमानुसार सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात यावी व उर्वरीत रक्कम परत करावी. (कलम ११.५ नुसार तीस दिवसांचे आत परत करावी)

२. रू. ७१८०–१००० = ६१८०/–या रक्कमेवर भारतीय रिझर्व बँकेच्या दराने व्याज देण्यात यावे.
तक्रारीचे पुष्ठयर्थ माहे डिसेंबर २०१३ चे बील जोडत आहे.

**वितरण कंपनीची बाजु :–**

वितरण कंपनीच्या वतीने कार्यकारी अभियंता भुसावळ यानीं पत्र क्र.काअ/शवग्रा/भुसावळ/तां/७८४४. दि.०८.१०.२०१४ व्दारे दिलेला अहवाल व परिपत्रकक्र. ९५ दि. १६.०७.२००९ मंचापुढे सादर केले आहे. आपली बाजु मांडतांना वितरण कंपनीच्या प्रतिनिधीनी सांगितले की :



Scanned by CamScanner

1. As per the Electricity supply code regulation, 2005 clause 11.2, the average bill of consumer Shri V M Nemade ( average of last 12 months ) is Rs 1500/-
2. As per clause 11.5 of said code , SD maintained by consumer is higher than required i.e. required is Rs 1500/- against of Rs-7180/-. Hence MSEDCL is ready to refund the additional SD held Rs 5680/- to consumer.
3. Intrest on SD is regularly paid to consumer in every financial year through bill.
4. In FY 2014-2015 the amount of Rs 463/- is paid as interest to consumer, Shri V M Nemade through bill adjustment of May 2014.

## मंचाचे निष्कर्ष :-

१. मंचाच्या असे निदर्शनास आले आहे कि या प्रकरणात संबंधित नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता , जळगांव, मंडळ कार्यालय यांनी कुठलेही प्रतिवेदन सादर केलेले नाही. याबाबत कुठलाही खुलासा त्यांनी मंचाच्या सुनावणीच्या वेळी सादर केला नाही. तसेच संबंधित नोडल तथा अधिकारी कार्यकारी अभियंता , जळगांव, मंडळ कार्यालय हे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे अध्यक्ष आहेत. सदर ग्राहकाने दि. २४.०३.२०१४ ला अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाला सादर केलेल्या तक्रारीवर सुमारे ७ महिने काहीही कार्यवाही केली नाही. याबाबत कुठलाही समाधानकारक खुलासा त्यांनी मंचाच्या सुनावणीच्या वेळी दिला नाही. या बाबी मुख्य अभियंता , जळगाव परीमंडल यांचे निदर्शनास आणण्यात येत असून त्यांनी दखल घेवून कारवाई करावी असे मंच सुचित करीत आहे.

२. वितरण कंपनीच्या दि. ०८/१०/२०१४ च्या पत्राने तक्रारदार ग्राहकाचे समाधान झाले आहे.

३. आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता ,२००५ च्या विनियम क्र. ११.५ नुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम वितरण कंपनीने परत करायची आहे. त्या संबंधीचा नियम खालील प्रमाणे आहेः

> "Where the amount of security deposit maintained by the consumer is higher than the security required to be maintained under this Regulation 11, the Distribution Licensee shall refund the excess amount of such security deposit in a single payment:
>
> > Provided that such refund shall be made upon request of the person who gave the security and with an intimation to the consumer, if different from such person, shall be, at the option of such person, either by way of adjustment in the next bill or by way of a separate cheque payment within a period of thirty (30) days from the receipt of such request:..."

४. म्हणून वितरण कंपनीने अतिरिक्त सुरक्षा अनामत रु. ५६८०/- या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत स्वतंत्र धनादेशाद्वारे परत करावी, असे मंच निर्देशित करीत आहे.

५. मंचाचे सदस्य –सचिव हे सदरील कालावधीत काही काळ रजेवर असल्याने तसेच रजेवरून आल्यानंतर अधिक्षक अभियंता,(पायाभुत आराखडा ) या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे व मंचावर तिसऱ्या सदस्याची नियुक्ती नसल्याने हे प्रकरण सुनावणीस घेण्यास उशीर झाला. त्यामुळे प्रकरण प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत निर्णय देता आला नाही.



Scanned by CamScanner

ग्राहकाचे प्रतिनिवेदन ,विदयुत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करून मंच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. या आदेशाच्या तारखेपासून **१५** दिवसाच्या आत वितरण कंपनीने अतिरिक्त सुरक्षा अनामत **रु. ५६८०/-** स्वतंत्र धनादेशाद्वारे तक्रारदारास परत करावी.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निश्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.

४. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा - महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ "केशवा" बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई- ४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

**बिभीषण सु. निर्मळ.**
सदस्य-सचिव

**सुरेश पां. वाघ.**
अध्यक्ष

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, जळगाव परिमंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.), विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव
२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव



Scanned by CamScanner